गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे ● अंक ८२ वा ● शुक्रवार ०९ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 82 | Date : 09/08/2024 | blow Friday Page|4 Price 4

## कर्नाटकचे तरुण पत्तेचा खेळ खेळण्यासाठी तोळणुरात मांडले ठाण!

### क्लब चालकांना पोलिस अधिकाऱ्यांची साथ गांवच बनतो क्लबचा अड्डा ?



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधी :महाराष्ट्र,कर्नाटक सीमेवर वसलेल्या तोळणुर येते कर्नाटक येथून जुगार खेळण्यासाठी योणाऱ्या अतिउत्साही लोकांच्या मदतीने क्लब चालकांनी तोळणुर गावात पत्यांचा डावच मांडला आहे.यामुळे गावच क्लबचा अड्डा बनला असुन रोज लाखो रुपयाचा उलाढाल होत आहे.अक्कलकोटचे डीवायएसपी व पोलीस निरीक्षकांच्या डोळ्यात धुळ फेकुन पत्त्याचा अवैध धंदा मांडला जात आहे की? पोलिसांच्या नजरे समोर धंदा केला जातो.यावर लोकांचा प्रश्न्न चिन्ह आहे. तोळणुर परिसरात सध्या सुरू असलेल्या पत्त्याच्या अवैद्य धंद्यामुळे कमीतकमी कालावधीत जास्तीतजास्त श्रीमंत होण्याच्या हव्याशापोटी तरुण पत्त्याच्या आहारी गेले आहे.आर्थिक दृष्ट्या आपली भूक भागवण्यासाठी तो गुन्हेगारीचा रस्ता पत्करतो आहे.कर्नाटकातून येणाऱ्या तरुणांना गुन्हेगारी बनवण्यात क्लब चालकांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे.यामध्ये राजकीय पुढाऱ्यांचे बगलबच्चे सुद्धा या रमीच्या खेळात सहभाग असल्यामुळे रमीचा खेळ बिनधास्त सुरू आहे.या खेळावर राजकीय वरदस्त असल्याचे सांगण्यात येत आहे.

तोळणुरच्या क्लबमध्ये पत्त्यांचा खेळ खेळताना अनेक तरुण व अनेकांचे संसार उद्ध्वस्त होताना दिसत आहे.पत्ते खेळणाऱ्यांनी दुविधा अवस्थेत सापडले.त्यांच्यासमोर अंधारच दिसत आहे.

क्लबमध्ये पैसे हरल्यामुळे कित्येक तरुण कर्जबाजारी झाले.या क्लबमध्ये राजकीय पक्षाचे पुढारी देखील सामील असल्याचे कळते.राजकीय पक्ष्यांच्या आशीर्वादामुळेच हा क्लब सुरू असुन पोलीस प्रशासन सुद्धा क्लब चालकांना खतपाणी घालत आहे. स्वत:चे खिसे भरण्यात गुंतल्याने अक्कलकोटचे पोलीस यंत्रणा कमकुवत ठरली आहे.या यंत्रणेपेक्षा क्लब चालक वरचढ आहे.हे काही वेगळी परिस्थिती नाही.क्लब चालक आर्थिक पाठबळावर संपूर्ण व्यवस्थेवर कसे नियंत्रण ठेवतात? हे सध्या तोळणुर येथे पहायला मिळते.क्लब चालकांवर काही अधिकाऱ्यांची किती मेहरनजर आहे? याचे प्रत्यंतर आले.पत्त्यांच्या नादी लागलेले अनेक सर्वसामान्य नागरिक कफल्लक बनले आहेत.परिसरातील जुगारी अड्ड्यांवर रोज मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाली सुरू आहेत.

### ५२ वर्षांपूर्वीच्या इतिहासाची केली पुनरावृत्ती

## भारतीय हॉकी संघाला कांस्यपदक



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पॅरिस : पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारतीय हॉकी संघाने कांस्यपदक जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. कांस्यपदकाच्या लढतीत भारताने स्पेनचा २-१ असा पराभव केला. त्याचबरोबर भारताचे हे एकूण चौथे कांस्यपदक आहे. याशिवाय देशाने ऑलिम्पिक इतिहासात सर्वाधिक ८ सुवर्ण आणि १ रौप्य पदक जिंकले आहे. गेल्या टोकियो ऑलिम्पिकमध्येही भारताने कांस्यपदक जिंकले होते. यासह भारतीय हॉकी संघाने ५२ वर्षांनंतर ऑलिम्पिकमध्ये इतिहासाची पुनरावृत्ती केली आहे.वास्तविक, भारतीय हॉकी संघाने ५२ वर्षांनंतर ऑलिम्पिकमध्ये सलग २ पदके जिंकली आहेत. यापूर्वी १९६० ते १९७२ पर्यंत भारताने हॉकीमध्ये सलग ४ पदके जिंकली होती. त्यानंतर १९७६ च्या ऑलिम्पिकमध्ये देशाला एकही पदक मिळाले नाही. यानंतर १९८० मध्ये सुवर्णपदक जिंकले.

१९७२ नंतर भारताने हॉकीमध्ये सलग दोन पदके जिंकली -

१९८० पासून भारतीय संघ ऑलिम्पिकमध्ये पदकासाठी तळमळत होता. त्यानंतर ४० वर्षांनंतर पदकाचा दुष्काळ संपला आणि भारतीय हॉकी संघाने टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक पटकावले. आता हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकून ५२ वर्षांनंतर इतिहास घडवला आहे. १९७२ नंतर भारताने हॉकीमध्ये सलग दोन पदके जिंकली आहेत. १९६८ आणि १९७२ मध्येही भारताने सलग दोन कांस्यपदके जिंकली होती.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने आतापर्यंत (८ ऑगस्ट) ४ पदके जिंकली आहेत. चारही कांस्यपदके मिळवली आहेत. मागील तीन कांस्यपदके नेमबाजीत जिंकली आहेत. मनू भाकेरने १० मीटर एअर पिस्तूलमध्ये प्रथम कांस्यपदक मिळवले. त्यानंतर मनू भाकेरनेही मिश्र सांघिक स्पर्धेत सरबज्योत सिंगसोबत दुसरे कांस्य मिळवले. यानंतर स्वप्नील कुसाळेने पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन नेमबाजीत तिसरे कांस्यपदक जिंकले. आता हॉकीमध्ये भारताला चौथे कांस्यपदक मिळाले आहे.



## नीरज चोप्राची रौप्यपदकाला गवसणी

### ऐतिहासिक थ्रो करत पॅरिसमध्ये भारताला मिळवून दिलं पाचवं पदक

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली :भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्राने रौप्यपदकाला गवसणी घालत भारताला पॅरिस ऑलिम्पिकमधील पाचवे पदक मिळवून दिले आहे. नीरज चोप्राने भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत ८९.४५ थ्रो करत रौप्य पदक मिळवले आहे. यंदाच्या ऑलिम्पिकमधील भारताचं हे पहिलं रौप्य पदक आहे. नीरज चोप्राचे अंतिम फेरीत पाचपैकी ४ थ्रो फाऊल गेले पण त्याने दुसऱ्याच थ्रोमध्ये ८९ मी चा टप्पा गाठला आणि अर्शद नदीम वगळता इतर कोणताही खेळाडू या क्रमांकापर्यंत पोहोचू शकला नाही. पाकिस्तानचा अर्शद नदीम प्रथम तर भारताचा नीरज चोप्रा दुसऱ्या स्थानी आला आहे. तर तिसरा क्रमांक ग्रेनेडाच्या अँडरसन पीटर्सने ८८.५४ मीटरसह मिळवला.

नीरजने यंदाच्या मोसमातील ८९.४५ हा सर्वोत्कृष्ट थ्रो केला आहे. या सर्वोत्कृष्ट थ्रोसह त्याने रौप्यपदकासह त्याचं दुसरं ऑलिम्पिक पदक मिळवलं आहे. अशाप्रकारे नीरज चोप्रा ट्रॅक आणि फील्ड स्पर्धेत दोन पदके जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला. गेल्या ऑलिम्पिक स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या नीरज चोप्राने दुसऱ्या प्रयत्नात सर्वाधिक ८९.४५ मीटर भालाफेक केली, तर अर्शद नदीमने ९२.९७ मीटरसह ऑलिम्पिक विक्रम केला. नीरज चोप्राने टोकियो ऑलिम्पिकमध्ये ८७.५८ मीटर फेक करून सुवर्णपदक जिंकले होते, तर त्याची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ८९.९४ मीटर आहे, जी त्याने २०२२ मध्ये स्टॉकहोम डायमंड लीगमध्ये रौप्य पदक जिंकून मिळवली होती. मात्र दोन मीटर अधिक फेक करून त्याला रौप्यपदकावर । पान २ वर

## सर्व शासकीय कार्यालयांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत मंजूर पदाच्या ५ टक्के पदे भरावीत : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्य शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवली जात आहे. ही योजना राज्य शासनाची एक महत्त्वकांक्षी योजना असून सोलापूर जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयाने त्यांच्या आस्थापनेवरील सर्व मंजूर पदाच्या ५ टक्के पदे तर खाजगी आस्थापनानी त्यांच्या मंजूर पदाच्या १० टक्के पदे या योजनेअंतर्गत भरून त्यांना सहा महिने प्रशिक्षण



देऊन रोजगार उपलब्ध करावयाच्या आहे. तरी १५ ऑगस्ट २०२४ पूर्वी सर्व आस्थपनांनी ही पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत शासकीय विभाग प्रमुख व खाजगी उद्योजक यांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त हनुमंत नलावडे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष कोलते, महापालिकेचे उपायुक्त मच्छिंद्र घोलप, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने अन्य शासकीय विभाग प्रमुख व किर्लोस्कर बालाजी अमाईन यांच्यासह अन्य खाजगी उद्योगाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की जिल्ह्यातील सर्व । पान २ वर

## 'रस्ते दुरुस्तीच्या कामात हयगय नको', मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या अधिकऱ्यांना सूचना

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नाशिक : मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी रॅपीड क्वीक हार्डनर, एम सिक्टी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असून त्याचे काम प्रगतीपथावर आहे. तातडीने हे काम पूर्ण करून नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रीय महामार्ग, एमएसआरडी, सार्वजनिक बांधकाम, वाहतूक पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

नाशिक-भिवंडी रस्त्याच्या तातडीने दुरुस्तीसाठी युद्ध पातळीवर काम करण्याच्या सूचना देतानाच रस्ते दुरूस्तीच्या कामात हयगय करू नका. पीक अवरमध्ये अवजड वाहतुकीच्या नियमांसाठी कोकण विभागीय आयुक्तांनी एकत्रित अधिसूचना काढावी, अवजड वाहनांसाठी महामार्गालगत पार्कींग लॉट करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह येथे ठाणे, पालघर, नाशिक, रायगड जिल्ह्यातील महामार्गावरील



वाहतूक कोंडी, आगामी गणेशोत्सव कालावधीतील वाहतुकीच्या नियोजनाबाबत चर्चा झाली. यावेळी अपर मुख्य सचिव डॉ.आय.एस.चहल, प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, कोकण विभागीय आयुक्त पी.वेलारासु, जेएनपीटीचे अध्यक्ष उन्मेष वाघ, ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे, पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडखे, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्यासह आदी अधिकारी उपस्थित होते.। पान २ वर

## एक ही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी : विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार


### *विधानसभा निवडणूक पार्श्वभूमीवर संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचाऱ्यांना निवडणूक कामकाजाचे दर्जेदार प्रशिक्षण द्यावे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः १ जुलै २०२४ या अहर्ता दिनांकावर मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणी अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील एक ही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम आढावा बैठकीत विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपायुक्त पुनम मेहता अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, मनपा उप आयुक्त मच्छिंद्र घोलप, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी वीणा पवार, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मतदार यादी निरीक्षक डॉ. पुलकुंडवार पुढे म्हणाले की, निवडणूका पारदर्शक आणि न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी मतदार याद्यांचे अद्यावतीकरण, शुध्दीकरण अत्यंत महत्वपुर्ण असते, यासाठी मा.भारत निवडणूक आयोगाकडून विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम (दुसरा) राबविला आहे. दि.६ ऑगस्ट २०२४



रोजी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर आणि मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये प्रारूप यादी प्रकाशित करून यंदाच्या विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. मतदार यादी मध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहणार नाही व एकही पात्र मतदार येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये मतदानापासून । पान २ वर

# ९ ऑगस्ट जेष्ठ विचारवंत हरी नरके सर यांचा स्मृतिदिन.स्मृतिदिना निमित्त दोन शब्द

जेष्ठ विचारवंत,लेखक, अभ्यासक, संशोधक व उत्तम वक्ते म्हणून मा.हरी नरके सर आपल्या सर्वांना परिचित आहेत.हरी नरके सरांचे व्याख्यान आपल्यापैकी बऱ्याच जणांनी समोरासमोर बसून ऐकलेले असेल. त्यांच्या व्याख्यानाची आणि बोलण्याची पद्धत एकदम शांत संयमी आणि अभ्यासू असायची, एवढा मोठा विचारवंत असताना सुद्धा कागदावर लिहिलेले बरेच मुद्दे त्यांच्या सोबत असायचे.एवढा मोठा विचारवंत असून, उत्तम वक्ता असून सोबत कागदावर लिहिलेले मुद्दे ठेवण्यात त्यांना काहीच कमीपणा वाटत नव्हता.त्याच कारण म्हणजे बोलण्याच्या ओघात बरेच मुद्दे सांगायचे राहून जातात, ते राहून जाऊ नये म्हणून ते सोबत मुद्दे आणि पुरावे ठेवायचे.त्यांच्या भाषणामध्ये कधीच आराडाओरड नसायची, गरबड नसायची. अगदी लोकांना हसवत मनोरंजन करत ते समाजाचे प्रबोधन करायचे.

त्यांचा संविधान, आरक्षण, इतिहास, समाजसुधारक, मराठी भाषा इत्यादी अनेक विषयावर गाढा अभ्यास होता. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून महाराष्ट्र शासनाने २०१२ मध्ये जी रंगनाथ पठारे समिती नेमली होती त्या समितीची ते सदस्य होते. तसेच महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगावर त्यांनी सदस्य म्हणून काम केलेले आहे. १९९० मध्ये महाराष्ट्र शासनाने महात्मा फुले समंग्र वांङमय प्रकाशित केला होता. त्या समंग्र वाङमयच्या मुद्रणदोषाची जबाबदारी हरी नरके सरांवर होती. त्या वाङमयातील प्रत्येक शब्द नी



शब्द काळजीपूर्वक वाचून त्यातल्या त्रुटी दूर करून हरी नरके सरांनी त्याचा आढावा सादर केल्या नंतर तो वाङमय प्रकाशित झाला होता. पुणे येथील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून सुद्धा त्यांनी काम केलेलं आहे.

त्यांची संशोधन वृत्ती सुद्धा खूप जबरदस्त होती. सावित्रीमाई फुलेंचं अस्सल छायाचित्र असेल, त्यांच्या कविता संग्रहातल्या कविता असतील, महात्मा फुलेंनी लिहिलेलं मुर्त्युपत्र असेल अश्या अनेक बाबी त्यांनी संशोधनातुन पुढे आणलेल्या आहेत.

१ जून १९६३ रोजी पुणे येथे त्यांचा जन्म झाला होता. टेलको कंपनीत ते नौकरी करत होते. वाचनाची त्यांना फार आवड होती, त्यांच्या घरी असलेल्या पुस्तक ग्रंथालयात ५४ हजारापेक्षा जास्त पुस्तकं आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यात त्यांना जेल सुद्धा झाली होती. जाती अंतासाठी आंतरजातीय विवाह हा त्यांचा अट्टहास होता. आणि तो त्यांनी पूर्ण ही केला होता. संगीता नामक त्यांच्या पत्नी आणि प्रमिती ही त्यांची मुलगी असा त्यांचा परिवार होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा घरात फोटो लावला म्हणून त्यांच्या मामांनी त्यांना मारहान केल्याचं सुद्धा त्यांनी आपल्या भाषणामध्ये नमूद केलेले आहे. पुण्याचे ग्रहस्थ असलेले बाळ गांगल यांनी आपल्या लेखामधून महात्मा फुलेंच्या वर सत्यशोधक की ख्रिस्ती सेवक असे लेख लिहून महात्मा फुलेंवर खालच्या पातळीचे लिखाण केले होते. त्या लेखनाला उत्तर म्हणून जवळपास २५० पुरावे नरके सरांनी गांगलांच्या तोंडावर फेकून महात्मा फुले हे सत्यशोधक आहेत हे सिद्ध केलं होतं. नरके सर हे महाराष्ट्र शासनाच्या महात्मा फुले चरित्र साधने समितीचे सदस्य होते. त्यांना अनेक संस्थांचे वेगवेगळे पुरस्कार मिळालेले आहेत. देश विदेशात जाऊन व्याख्यान देण्याची संधी त्यांना मिळालेली होती, जवळ पास ६००० व्याख्यानं त्यांनी दिलेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुले यांच्यावर त्यांचा गाढा अभ्यास होता, महाराष्ट्रात असलेल्या वेगवेगळ्या चळवळीचे, संघटनेचे ते मार्गदर्शक होते.महात्मा फुले समता परिषदच्या माध्यमातून सुद्धा त्यांनी समाजप्रबोधन केलेलं आहे.त्यांच्या प्रबोधनाची ज्योत अखंड चालू असतानाच ९ ऑगस्ट २०२३ रोजी त्यांची प्राणजोत मावळली. आणि एक चालतं बोलतं विद्यापीठ आपल्याला सोडून गेलं.अश्या या थोर विचारवंतास स्मृतिदिनी विनम्र अभिवादन.

**– व्याख्याते परमेश्वर बनकर,मो.९५०३२८८२८२**

## संपादकीय

### पालक कमी पडतात ..?

मुलांमधील पार संपत चाललेला संवाद किंवा अडनिड्या वयातील विसंवाद हा सामाजिक चिंतेचा विषय आहे. तथापि ज्या कुटुंबात असा संवाद असतो त्या कुटुंबातील मुले त्यांच्याही नकळत सुजाण बनतात. याचा अनुभव नुकताच लखनौ पोलिसांना आणि पालकांना आला. त्या घटनेचे वृत्त माध्यमात प्रसिध्द झाले आहे. ते असे, एक मुलगी पाचवीत शिकते. तिचे वडील राजकीय नेते आहेत. शाळा सुटल्यावर तिच्या अपहरणाचा प्रयत्न दुचाकीस्वारांनी केला. 'तुझ्या बाबांनी तुला तातडीने बोलावले आहे. आम्हाला तुला घ्यायला पाठवले आहे', असे त्यांनी तिला सांगितले. तथापि 'अनोळखी यक्तींबरोबर जायचे नाही आणि कोणी काही दिले तर खायचे नाही असे माझ्या आईने मला सांगितले आहे.' असे त्या मुलीने त्या व्यक्तींना सांगितले. ते मुलीला जबरदस्ती करत होते, ते गर्दीचे ठिकाण असल्याने त्यांनी तिथून पळ काढला, मुलगी घरी गेल्यावर वडिलांनी तिला बोलावले नसल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हेच कारण सांगून मुलांचे अपहरण केल्याच्या घटना अधूनमधून घडतात. उपरोक्त घटनेतील मुलीला तिच्या आईने काही गोष्टी शिकवल्या नसत्या तर चित्र कदाचित वेगळे असू शकले असते. मुलांवर योग्य वयात योग्य संस्कार करणे हे पालकांचे कर्तव्य आहे. त्यासाठी संवाद आत्यंतिक गरजेचा असतो. तो साधण्यासाठी वेळ काढावा लागतो, ज्याची उणीव असल्याचा बहाणा सतत पुढे केला जाताना आढळतो. तथापि संवादाची गरज आणि वेळ वाया कुठे जातो याचे अवलोकन किती पालक करत असतील? संस्कार करण्यात गोष्टी आणि बोधकथा मोलाची भूमिका बजावतात. मोठ्यांचा आदर करणे, सकारात्मक विचार करणे, नम्रता, प्रामाणिकपणा, प्रेम, आपुलकी, साहचर्य, सहनशक्ती किंवा कर्तव्यभावना अशा अनेक गोष्टी सहज मारलेल्या गप्पांमधूनही शिकवल्या जाऊशकतात. त्या मुलीच्या आईने तिला सावधान कसे राहायचे, प्रसंगांचा सामना कसा करायचा हे शिकवले असावे म्हणूनच ती मुलगी धाडसाने तिचे अपहरण टाळू शकली. विसंवादाचे विपरीत परिणाम समाजाच्या अनुभवास येतात. बालगुन्हेगारी वाढत आहे. किरकोळ कारणांसाठी पंधरा-सोळा वर्षांची मुले एकमेकांच्या जीवावर उठतात. शाळेतील त्याच वयाची मुले त्यांच्याच मित्रांवर रॅगिंग करतात. अनेक मुले व्यसनांच्या आहारी जातात. तेव्हा मुलांना संस्कार किंवा वळण नाही, असे सरसकट बोलले जाते. पण ते लावण्यात त्यांचे पालक कमी पडले असू शकतील का?

पान १ वरुन

### एक ही पात्र मतदार मतदानापासून..

वंचित राहणार नाही याची खात्री मतदान अधिकारी यांनी करून घ्यावी, असे त्यांनी सुचित केले.

प्रारूप यादीमध्ये आपले नाव आहे किंवा नाही याची मतदारांनी खत्री करणे आवश्यक आहे. कारण, बरेचदा ऐन मतदानाच्या दिवशी आपले नांव मतदार यादीमध्ये नाही अशी तक्रार अनेक मतदारांकडून केली जाते. तसेच आपले नाव, पत्ता, लिंग, जन्म दिनांक, वय, ओळखपत्र क्रमांक, मतदारसंघ इ. तपशिल सुध्दा अचुक आहे का याची खात्री करणे आवश्यक आहे. ज्या मतदारांना सदर तपशिलामध्ये दुरूस्त्या करावयाच्या असतील त्यांनी अर्ज क्रमांक ८ भरावा. विशेष संक्षिप्त पुर्रनिक्षण कार्यकमांतर्गत एखाद्या मतदारासंघातील एखादा मतदार, यादीत दिलेल्या पत्यावर राहात नसेल, तर अशा नावा बद्दल त्याच मतदारसंघातील एखदा मतदार आक्षेप घेऊ शकतो. त्यामध्ये जर तथ्य आढळून आले तर पडताळणी करून संबंधित मतदाराच्या नावाची वगळणी केली जाते. मतदार याद्यांचे अद्यावतीकरण होण्यासाठी अशा अपात्र मतदारांची नावे वगळताना मतदार अधिकारी यांनी योग्य खबरदारी घ्यावी असे निर्देश डॉ. पुलकुंडवार यांनी दिले. विधानसभा निवडणुका २०२४ च्या अनुषंगाने सर्व उपविभागीय अधिकारी हे त्या त्या विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहणार आहेत तर तहसीलदार हे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी असतील त्यामुळे सर्व प्रशिक्षण अत्यंत व्यवस्थितपणे घ्यावे तसेच आपल्या अंतर्गत येणाऱ्या झोनल ऑफिसर व प्रिसायडिंग ऑफिसर यांना अत्यंत उत्कृष्ट प्रशिक्षण मिळेल याची व्यवस्था करावी. निवडणुकीत समाविष्ट होणारा प्रत्येक अधिकारी कर्मचारी याला नेमणूक कामकाजाचे व त्याला दिलेल्या जबाबदारीचे सर्व प्रशिक्षण व्यवस्थित होईल याकरता अत्यंत तज्ञ प्रशिक्षक नियुक्त करावेत असेही डॉ. पुलकुंडवार यांनी सुचित केले. मतदार स्लिप प्रत्येक मतदारापर्यंत विहित कालावधीत वितरित होईल यासाठी सर्व संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी योग्य नियोजन करावे या प्रक्रियेवर उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी नियंत्रण ठेवावे. निवडणूक कर्मचारी व सर्वसामान्य मतदारांना सॅम्पल मशीनद्वारे मतदान करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात यावे, असेही निर्देश डॉ. पुलकुंडवार यांनी दिले. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पीपीटी द्वारे मतदार नोंदणी, दुरूस्ती व वगळणी यासाठी दि.१० व ११ ऑगस्ट २०२४ व दि.१७ व १८ ऑगस्ट २०२४ या दिवशी विशेष संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रम राबविला जाणार असून या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर इङज मतदार यादीसह उपस्थित राहतील, तसेच दि.२३ जानेवारी २०२४ च्या अंतिम मतदार यादीमध्ये एकुण मतदार ३५ लाख ७८ हजार ९७२ इतकी होती, तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४, ३६ लाख ५६ हजार ८३३ इतकी होती. आज दि.६ ऑगस्ट २०२४ रोजी सदर मतदार संख्या ही ३६ लाख ९२ हजार ४०९ इतकी असून यामध्ये पुरूष- १९ लाख ८ हजार १४६, महिला-१७ लाख ८३ हजार ९६६ व इतर २९७ मतदारांचा समावेश आहे. यामध्ये लोकसभेच्या तुलनेत ३५ हजार ५७६ इतक्या मतदारांची वाढ झाल्याची माहिती त्यांनी दिली.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये एकूण ३६१७ मतदान केंद्र होती. यामध्ये मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण करून १२४ मतदान केंद्राची नव्याने वाढ होऊन मतदान केंद्राची संख्या ३७२३ झालेली आहे. एकूण ३७२३ मतदान केंद्रापैकी शहरी-११७७ व ग्रामीण भागामध्ये -२५४६ मतदान केंद्राचा समावेश आहे. तसेच नागरिकांनी आपली नावे विशेष पुर्ररिक्षण कार्यक्रम दि.६ ऑगस्ट २०२४ ते २० ऑगस्ट २०२४ या कालावधीत नोंदवून घेण्यात यावीत तसेच तद्नंतर सदर मतदार नोंदणी प्रक्रिया ही निरंतर सुरू राहणार आहे. ऑनलाईन मतदार नोंदणीसाठी मतदारांनी- ींशिी.शलळ.सीं.ळप आपली नावे मतदार यादमध्ये शोधणेसाठी लशे.ारहरीरिहीीर.सीं.ळप संकेतस्थळाचा वापर करण्याचे आवाहन ही जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आल्याची माहिती श्री आशीर्वाद यांनी दिली. राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांनी मतदार स्लीप वेळेत तसेच शंभर टक्के मतदारापर्यंत पोहोचली पाहिजे याची खात्री निवडणूक प्रशासनाने करावी. मतदार यादि साठी राजकीय पक्षाकडून पैसे घेऊ नयेत. वोटर सर्च प अद्यावत ठेवावे. मतदार नोंदणी प्रक्रियेत बीएलओ मतदार केंद्राच्या ठिकाणी उपस्थित नसतात तसेच ते राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना कोणत्याही प्रकारचे सहकार्य करत नाहीत तरी त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी असे सूचना मांडून मतदार यादी प्रसिद्ध झाल्यापासून अद्यावत मतदारांच्या याद्या राजकीय पक्षांना उपलब्ध करून द्याव्यात. बदललेले मतदान केंद्रे तसेच नव्याने निर्माण झालेले मतदान केंद्राची सविस्तर माहिती राजकीय पक्षांना उपलब्ध करून द्यावी अशा मागण्या करण्यात आल्या.

महसूल पंधरवडा : निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी दिनांक १ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या महसूल पंधरवाडा अंतर्गत आज रोजी पर्यंत घेण्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती विभागीय आयुक्त डॉक्टर पुलकुंडवार यांच्यासमोर सादर केली. मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्यक्रम मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना आधीची माहिती बैठकीत सादर करण्यात आली.

* स्वच्छ कार्यालय सुंदर कार्यालय : महसूल पंधरवडा अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नगरपालिका प्रशासन कार्यालयाने स्वच्छ कार्यालय सुंदर कार्यालय अंतर्गत केलेल्या कामाची माहिती जिल्हा प्रशासन अधिकारी विना पवार यांनी सादर केली.

*नियोजन भवन परिसरात वृक्षारोपण : विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते नियोजन भवन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह व निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी ही वृक्षारोपण केले. यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निराळी, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे आदी उपस्थित होते.

### सर्व शासकीय कार्यालयांनी मुख्यमंत्री

शासकीय यंत्रणा प्रमुखांनी त्यांच्याकडील मंजूर पदाच्या पाच टक्के पदे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत त्वरित भरण्याची कार्यवाही करावी. प्रशिक्षणासाठी नियुक्त केलेल्या संबंधित प्रशिक्षणार्थी यांना पुढील सहा महिने त्यांना आपल्या कार्यालयात विविध ठिकाणच्या कामाचे प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम करावयाचे आहे. त्यासाठी महास्वयम पोर्टलवर आपल्या कार्यालयाची नोंदणी करून पदाची मागणी करावी किंवा वृत्तपत्रात जाहिरात देऊन इच्छुक उमेदवारांना बोलावून त्यांचे वॉक इन इंटरव्ह्यूव त्वरित घेण्याची कार्यवाही करून त्यांना तात्काळ आदेश देऊन कार्यालयात रुजू करून घेण्याचे सूचना त्यांनी केली. तर जिल्ह्यातील खाजगी आस्थापना उद्योजक यांनी त्यांच्याकडे मॅन्युफॅक्चरिंग फिल्डमध्ये काम करणाऱ्या एकूण पदाच्या दहा टक्के तर सर्विस सेक्टर मधील एकूण पदाच्या २०% पदे या योजने अंतर्गत महास्वयम पोर्टलवर नोंदणी करून आपल्या आस्थापनेमध्ये नियुक्त करून घेऊन त्यांना विविध कामाचे प्रशिक्षण द्यावे असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले.

प्रारंभी निवासी उप जिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी या योजनेअंतर्गत उमेदवारांना उद्योजकाकडे प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षण द्वारे रोजगार क्षम करण्याचा शासनाचा उद्देश असल्याचे सांगून या योजने करिता संपूर्ण राज्यासाठी ५५०० कोटीचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या योजनेची अंमलबजावणी यंत्रणा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता आयुक्तालय महाराष्ट्र राज्य हे असल्याचे त्यांनी सांगितले.

'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण यो मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे स्वरूपः- उद्‌्योजकांना त्यांच्या उद्‌्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.**ठळक वैशिष्टे:** बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवार. https://rojgar mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करू शकतील. विविध क्षेत्रातील मोठे प्रकल्प, उद्योग/स्टार्टअप्स, विविध आस्थापना इ. यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी- https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदवतील. सुमारे १० लाख कार्य प्रशिक्षणच्या संधी प्रत्येक आर्थिक वर्षात या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होतील, सदर कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असेल व या कालावधीसाठी उमेदवारांना शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल.सदर विद्यावेतन लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात (DBT) जमा करण्यात येईल.

**आस्थापना/उद्‌्योजकासाठी पात्रता** : आस्थापना / उद्योग महाराष्ट्र राज्यात कार्यरत असावा. आस्थापना उद्योजकाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नौदणी केलेली असावी. नाविन्यता विभागाच्याआस्थापना / उद्‌्योगाची स्थापना किमान ३ वर्ष पूर्वीची असावी,आस्थापना / उद्‌्योगानी EPF, ESIC, GST, Certificate of incorporation, DPIT व उद्योग आधारची नोंदणी केलेली असावी.**उमेदवारांची पात्रता**: उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे. उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२ वी पास/आयटीआय/पदविका/पदवीधर/पदव्युतर असावी. उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा. उमेदवाराचे आधार नोंदणी असावी. उमेदवाराचे बैंक खाते आधार संलग्न असावे. उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी.

शैक्षणिक अर्हतेप्रमाणे विद्यावेतनाचे विवरण खालील प्रमाणे असेल. १२वी पास उमेदवारासाठी प्रतीमहा ६ हजार रुपये, आय टी आय /पदविका साठी ८ हजार रुपये तर पदवीधर किंवा पदव्युत्तर साठी १० हजार रुपये प्रतिमहा रुपये विद्यावेतन असणार आहे. संपर्क अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र अथवा हेल्पलाईन क्रमांक-१८०० १२० ८०४० किंवा ०२१७-२९९२९५६ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

### नीरज चोप्राची रौप्यपदकाला..

समाधान मानावे लागले.

भालाफेकच्या अंतिम फेरीत नीरज चोप्राची सुरूवात फारच निराशाजनक झाली. पण त्याने दुसऱ्याच प्रयत्नात ८९.४५ थ्रो करत दुसरे स्थान निश्रि्चत केले. मात्र पुढील तिन्ही थ्रो नीरजचे फाऊल राहिले, त्यामुळे तो निराशही दिसत होता. पण त्याचा दुसरा थ्रो इतका कमाल होता की त्याने आपले दुसरे स्थान कायम ठेवले. टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकलेल्या नीरजने भारतीयांच्या अपेक्षा कायम ठेवत भारतासाठी पदक जिंकलेच. तर पहिला क्रमांक पटकावत सुवर्णपदकाला गवसणी घातलेल्या अर्शदने या अंतिम फेरीतील दुसऱ्या प्रयत्नात तब्बल ९२.९७ मी. लांब भाला फेकत नवा ऑलिम्पिक विक्रम केला आहे. याआधी ९० मी. लांब भाला फेकण्याचा विक्रम होता. पण अरशदने हा विक्रम मोडला. आता तो अंतिम फेरीत पहिल्या स्थानी आला. तर नीरज चोप्राला मागे टाकले आहे. नीरज ८९.४५ मीटर फेक करून दुसरा आला आहे.

### 'रस्ते दुरुस्तीच्या कामात हयगय नको',

दरम्यान, नाशिक-भिवंडी रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे वाहतुकीसाठी अडचणी होत आहेत. पावसाळ्यात रस्त्याची अवस्था खराब झाली आहे. यामुळे वाहतुकीची कोंडी, अपघात होत आहेत. याची मुख्यमंत्री शिंदे यांनी गंभीर दखल घेतली असून रस्ता दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करून ते चांगल्या दर्जाचे आणि जलद गतीने करावे, अशा सूचना दिल्या आहेत.ठाणे ते नाशिक, ठाणे ते अहमदाबाद या महामार्गावरील खड्ड्यांबाबत मुख्यमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे होणाऱ्या त्रासातून तात्काळ दिलासा देण्यासाठी यंत्रणांनी दिवसरात्र एक करून खड्डे बुजवावेत. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून खड्डे बुजवताना रॅपीड क्वीक सेटींग हार्डनर, एम सिक्टी या साहित्याच्या वापराने तात्काळ खड्डे बुजवावे. वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळेल, यासाठी प्रयत्न करा, ज्या ठिकाणी खड्डे भरायला कालावधी आवश्यक असतो तेथे प्रीकास्ट पॅनलचा वापर करावा. राष्ट्रीय महामार्ग व्यवस्थापनाने त्यासाठी तातडीने कार्यवाही करावी. यंत्रणांनी समन्वयातून काम करावीत. दुरुस्तीच्या कामात अडथळा आणणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

### जपानमध्ये ७.१ रिश्टर स्केलचा भूकंप, त्सुनामीचाही इशारा

नवी दिल्ली : जपानच्या दक्षिणेकडील किनारपट्टीला आज ७.१ रिश्टर स्केल भूकंपाचा धक्का बसला आहे. यानंतर जपानच्या यंत्रणांनी या भागात त्सुनामी येण्याचा इशारा दिला आहे. जपानच्या सरकारी माहिती प्रसारण संस्था एनएचकेने दिलेल्या माहितीनुसार, जपानच्या दक्षिणेकडील क्युशू आणि शिकोकू या बेटांना त्सुनामीचा इशारा दिला आहे.जपानच्या हवामान संस्थेने आज पहिल्यांदा माहिती देताना सांगितले की, भूकंपाची तीव्रता ६.९ रिश्टर स्केल इतकी नोंदविली गेली होती. परंतु नंतरच्या अनुमानात सुधार करून भूकंपाची तीव्रता ७.१ रिश्टर स्केल असल्याचे सांगितले गेले. जपानच्या दक्षिणेकडील मुख्य बेटांना भूकंपाचा धक्का बसल्याचे सांगितले जात आहे. तसेच या भूकंपाची खोली ३० किमीपर्यंत पसरल्याचेही हवामान संस्थेने सांगितले आहे.जपान हवामान संस्थेने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार दक्षिणेकडील किनारपट्टीला जवळपास १ मीटरच्या लाटांची त्सुनामी धडकण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. एनएचकेच्या हवाल्याने रॉयटर्स या वृत्तसंस्थेने दिलेल्या बातमीनुसार, क्युशू बेटाजवळ २० सेंटीमीटर उंच लाटा पाहिल्या गेल्या आहेत. दरम्यान क्युशू आणि शिकोकू बेटांवर असलेल्या अणुऊर्जा प्रकल्पांना हानी पोहोचली आहे

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# सोयाबीन पिकाला यंदा मोठा फटका बसणार!शेतकरी चिंतेत



**दैनिक यशसिद्धी न्यूज**

उमरगा /प्रतिनिधी : पाऊस वेळेवर आणि समाधानकारक पडल्याने २०२४खरीप हंगामातील पेरणी यंदा वेळेवर झाली असल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. परंतु निसर्गाच्या अवकृपेने शेतकऱ्यांच्या आनंदात विरजण पडले.

सतत रिमझिम पाऊस पडत राहिल्याने सूर्यप्रकाशा अभावी म्हणा किंवा कायम तेच ते पिक त्या शेतात घेतल्यानं मुळकुज, चक्रीभुंगा, खोड किड, बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव उमरगा तालुक्यातील सुपतगाव सह परिसरात जाणवत आहे. यंदा मोठा फटका सोयाबीन पिकाला बसणार आहे. जुलै महिन्यात सतत रिमझिम पाऊस पडलेल्या भागात सोयाबीन पिके पिवळी पडून पिकांची वाढ म्हणावं तशी झाली नाही. आता मुळकुज खोडकिड आणि चक्रीभुंगा यामुळे सोयाबीन पिवळे पडून उत्पादनाला मोठा फटका नक्कीच बसणार यात शंका नाही.

कमी भाव मिळत असल्याने गेल्या वर्षीचा माल आणखी काही शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे. उत्पादन घडणाऱ्या यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.तरी कृषी विभागाने याकडे त्वरित लक्ष देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# मंगळवेढा तालुक्यातील पांडुरंग परिवाराच्या बैठकांचे सत्र सुरू, परिचारक समर्थकांचा उत्साह वाढला

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी:आगामी विधानसभा निवडणुकीत परिचारक गटाची भूमिका काय याची मोठी उत्सुकता पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात लागून राहिले नाही दिसून येत होते २०२१ मध्ये झालेल्या पोटनिवडणूक आमदार समाधान आवताडे यांना भाजप कडून उमेदवारी मिळालेली माजी आमदार प्रशांतराव परिचय आणि त्यांच्या समर्थकांना आमदार आवताडे यांच्या विजयासाठी आपली ताकद पणाला लावली लावावी लागली होती टिळक स्मारक मैदान येथे झालेल्या सभेत माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी आपल्या समर्थकांना मोठ्या मालकाची शपथ घालीत समाधान आवताडे यांच्या विजयासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आवाहन केले होते तर या पोटनिवडणुकीस वेळी उमेदवारी देताना पुढील सार्वत्रिक विधानसभा निवडणुकी वेळी आमदार समाधान आवताडे यांनी परिचारक यांना



सोशल मीडियातून व्यक्त होताना दिसून येत आहेत तर अपक्ष निवडणूक लढवणार असल्याची चर्चा होताना दिसून येत आहे तर दुसरीकडे भाजपकडून विद्यमान आमदार समाधान आवताडे यांना उमेदवारी दिली जाणार की माझी आमदार प्रशांतराव परदेशी यांना मैदानात उतरवले जाणार याबाबत आणून अनिश्रिचतता कायम आहे

नुकत्याच पार पडलेल्या माढा लोकसभा निवडणुकीत मोहिते पाटील आणि माजी खासदार निंबाळकर यांच्यात उमेदवारीवरून मोठी रसिकेत नावावर शिका मुहूर्त करणारे यावेळी स्पष्ट नाही झाले तर परिचारक समर्थकांचा आग्रह पाहता परिचारक वेगळा निर्णय घेऊ शकतात अशी शक्यता वर्तवली जात आहे. १७ ऑगस्ट रोजी सूर्य माजी आमदार सुधाकर पंत परिचारक यांच्या स्मृतिदिनी असून त्याच दिवशी माजी आमदार प्रशांतराव परिचारक उमेश परिचारक यांनी आपला निर्णय जाहीरिका जाहीर करावा असा आग्रह यांची समर्थक व सोशल मीडिया वरून व्यक्त करताना दिसून येत आहे तर आता परिचारक यांनीही विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेत पहिले उचलण्यास सुरुवात केली असून नुकतीच त्यांनी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे हॉलमध्ये विविध गावातील पांडुरंग परिवाराच्या गाव पातळीवरील नेते आणि समर्थकांच्या भावना जाणून घेतल्या जात आहे

निवडणूक अपक्ष लढवावी का भाजपकडून लढवावी त्या तुतारी चिन्हावर लढवावी याबाबतही कानोसा घेतला जात असल्याची चर्चा आहे तर मागील दोन काही दिवसापासून मंगळवेढा तालुक्यातील विविध जिल्हा परिषद गटातून पांडुरंग परिवाराच्या बैठका पार पडत असून यात माजी आमदार प्रशांतराव परिचारक समर्थकांच्या भावना जाणून घेत आहेत आपले मनोगत व्यक्त करताना दिसून येत आहेत दिनांक १७ ऑगस्ट रोजी परिचारक आपला निर्णय नक्की जाहीर करतील अशी शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होऊ लागले आहे

## रिपाइं आठवले गटाच्या वतीने पोलिस हवलदार वाळके यांचे सत्कार



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः उत्तर पोलिस स्टेशनचे कर्मचारी प्रविण वाळके साहेब यांनी अक्कलकोट उत्तर पोलिस ठाणे मध्ये गेल्या सहा वर्षांपासून अतिशय चांगली कामगिरी करुन येथील कालावधी पूर्ण झाल्याने त्यांची शासकीय बदली सोलापूर येथे अनैतिक मानवी वाहतूक शाखा येथे झाल्याने रिपाइं आठवले गटाच्या वतीने सत्कार करण्यात आले यावेळी रिपाइं तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, माळी महासंघ अक्कलकोट तालुका अध्यक्ष अप्पू (संतोष) पराणे, रिपाइं अक्कलकोट तालुका कोशाध्यक्ष अंबादास गायकवाड,पोलिस अधिकारी राजू राठोड,अजय साखरे,बुडून तांबोळी, वसंत चव्हाण,आदी उपस्थित होते

# अखेर विदर्भ पटवारी व मंडळ अधिकारी यांच्या आंदोलनाला यश ,अन्यायकारक प्रस्थावित बदल्या रद्द

## तलाठी व मंडळ अधिकारी यांचे रजा आंदोलन स्थगित

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

बुलढाणा / राहुल साबळे : बुलढाणा जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील तलाठी यांच्या प्रस्तावित केलेल्या अन्यायकारक बदल्या रद्द करण्यासाठी व इतर प्रलंबित मागण्या संदर्भामध्ये विदर्भ पटवारी व मंडळ अधिकारी संग नागपुर जिल्हा बुलढाणा यांनी जिल्हाध्यक्ष वीरेंद्र कुमार धोंडगे यांच्या नेतृत्वामध्ये दि १८ जुलैपासून आंदोलन सुरू केले होते,त्यानंतर २९ जुलै रोजी तलाठी व मंडळ अधिकारी यांनी सामूहिक रजा आंदोलन करून रजेवर गेले,

त्यानंतर शेतकरी विद्यार्थी यांना तलाठी व मंडळ अधिकारी हे रजेवर गेल्यामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागला,त्यानंतर ७ ऑगस्ट रोजी जिल्हा प्रशासनाने कुठलाही सकारात्मक तोडगा न काढल्यामुळे विदर्भ अध्यक्ष नागपूर बाळकृष्ण गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलनाची व्याप्ती वाढवण्याचा इशारा सुद्धा दिला होता अखेर ११ दिवसाच्या रजा आंदोलनानंतर दि ८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उपजिल्हाधिकारी निर्भय जैन अप्पर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार,उपविभागीय अधिकारी शरद पाटील बुलढाणा,यांच्या उपस्थितीमध्ये विदर्भ पटवारी संघ व मंडळ अधिकारी संघ नागपूर जिल्हा शाखा बुलढाणा यांच्यासोबत आंदोलन मांगे घेण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली,सदर झालेल्या चर्चेमध्ये प्रस्तावित अन्यायकारक बदल्यांचा प्रस्ताव रद्द करण्यात आल्या बाबत जाहीर करण्यात आले ,नियतकालित बदल्या करता समुपदेशन घेण्यात आले,त्याबाबत आश्र्वासित करण्यात आले,आपसी बदल्या नियमानुसार करण्याचे आश्र्वासन देण्यात आले,आंदोलन काळातील सामूहिक रजा ह्या अर्जित रजत परावर्तित करण्याचे मान्य



करण्यात आले,नवीन तलाठी व मंडळ अधिकारी यांना लॅपटॉप व प्रिंटर देण्याचे मान्य करण्यात आले,तसेच आंदोलन काळामध्ये गौण खनिज बाबत संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यावर कारवाई न करण्याचे आश्र्वासित करण्यात आले,अशा सकारात्मक चर्चा झाल्यामुळे विदर्भ पटवारी व मंडळ अधिकारी संघ नागपूर जिल्हा बुलढाणा शाखा यांच्यावतीने तूर्तास आंदोलन स्थगित करण्यात आले,सदर जिल्हा प्रशासनासोबत चर्चेच्या वेळी जिल्हा पटवारी संघाचे जिल्हाध्यक्ष विजेंद्र कुमार धोंडगे,विदर्भ मंडळ अधिकारी केंद्रीय अध्यक्ष विजय टाकळे,मंडळ अधिकारी संघाचे सहसचिव प्रेमानंद वानखेडे,मंडळ अधिकारी संघाचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत सातपुते,अशोक शेळके जिल्हा सचिव मंडळ अधिकारी संघ,विनोद भिसे विपसं जि उपाध्यक्ष,शिवानंद वाकतकर जिल्हा सचिव,संजय डुकरे संतोष राठोड यांच्यासह जिल्ह्यातील आजी-माजी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते .

## श्री साईनाथ रुग्णालयातील नविन अद्यावत अपघात विभागाचा लोकार्पण सोहळा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

श्री. साईनाथ रुग्णालयातील अपघात व अतिदक्षता विभागाचे लोकार्पण वा. श्री साईनाथ रुग्णालय (२०० रुम) येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर भा.प्र.से व व श्री अमरा बच्चु चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त श्री संगला शैषाद्री वासु यांचे हस्ते पार पडला.

डॉ.अमरा बच्चु एम.डी.पी.एच.डी (यु.एस) यांचे स्मृती प्रित्यर्थ श्री अमरा बच्चु चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक श्री कृष्णा कुमार बच्चु यांनी श्री साईनाथ रुग्णालयात येथे नविन अद्यावत अपघात विभाग व अतिदक्षता विभाग सुरु करणेसाठी श्री अमरा बच्चु चॅरिटेबल ट्रस्टचे वतीने सुमारे १.५ कोटी रुपये देणगी दिलेली.

सदर उद्घाटन प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे, दोन्हीही हॉस्पिटलमधील डॉक्टर्स, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या कार्यकाळास एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल सत्कार

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत तत्परतेने कामकाज केल्याबद्दल विशेषतः दिव्यांगाच्या कल्याणाच्या योजना अत्यंत प्रभावीपणे राबवल्याबद्दल प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने पक्षाचे शहर प्रमुख अजित कुलकर्णी व जिल्हा संपर्कप्रमुख जमीर भाई शेख यांनी पुष्पहार देऊन जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांचा सत्कार केला.



यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे शहर प्रमुख अजित कुलकर्णी, जिल्हा संपर्कप्रमुख जमीरभाई शेख, शहर कार्याध्यक्ष खालीद मणियार , दक्षिण तालुका अध्यक्ष सिद्धाराम काळे , रियाज सुगुर हे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्यात पदभार स्वीकारल्यापासून कार्तिकी वारी २०२३ ही स्वच्छ वारीचे आयोजन, टंचाई काळात उपाययोजना राबवणे, शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून २५% अग्रीम मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका, अतिवृष्टीने नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देणे, रेनगर प्रकल्पाचे घरकुल वितरण कार्यक्रमासाठी प्रधानमंत्री महोदय यांच्या दौऱ्याचे यशस्वी आयोजन, टंचाई काळात उजनी धरणातून पाणी वितरण, सोलापूर महापालिकेचा अतिरिक्त पदभार स्वीकारल्यानंतर दुहेरी पाईपलाईन साठी केलेले प्रयत्न, जिल्ह्याच्या पर्यटनासाठी करत असलेल्या उपायोजना, आषाढी वारी २०२४ चे यशस्वी आयोजन, जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी करत असलेले प्रयत्न तसेच दिव्यांगाने साहित्य वाटप करण्यासाठी घेण्यात आलेला मिळावा तसेच दिनांक १९ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान अंतर्गत प्रमाणपत्र वाटप शिबिराचे आयोजन आदी विविध महत्त्वपूर्ण कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने हा सत्कार करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा संपर्कप्रमुख जमीर भाई शेख यांनी दिली.

# शिर्डी येथील अधिवेशनास कळंब तालुक्यातील पदाधिकारी व सदस्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

कळंब/सुधाकर रणदिवे : पत्रकार सर्वसामान्यांच्या बातम्यांना शासन व प्रशासन दरबारी मांडून त्यांना न्याय देण्याचे काम करतो. मात्र पत्रकारांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो विशेष म्हणजे त्यांची आर्थिक बाजू सक्षम नसल्यामुळे त्यांचे आर्थिक स्त्रोत वाढला पाहिजे. तसेच ६० वर्षानंतर पत्रकारांना किमान व्यवस्थित जगता यावे यासाठी पेन्शन मिळणे आवश्यक आहे. मात्र त्यासाठी जाचक अटी लाद्या असून त्या अटी शिथिल करण्यात याव्यात अशी मागणी व्हाईस ऑफ मीडियाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष विजय चोरडिया यांनी केली ,दरम्यान शिर्डी येथे दि. ३१ ऑगस्ट व १ सप्टेंबर असे दोन दिवशीय होणाऱ्या पत्रकारांच्या अधिवेशनास सर्व पत्रकारांनी उपस्थित रहावे असे आवाहन त्यांनी केले.

व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथे व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. या संदर्भात कळंब शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मराठवाडा उपाध्यक्ष अमर चोंदे, धाराशिव जिल्हा अध्यक्ष हुंकार बनसोडे, जिंतूर तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण आदी उपस्थित होते. पुढे बोलताना चोरडिया म्हणाले की, पत्रकारांचे विशेषतः ग्रामीण भागातील पत्रकारांचे विविध प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रश्न प्रलंबित आहेत. ते प्रश्न व्हाईस ऑफ मीडियाने प्रशासन व शासन दरबारी मांडून त्यांची सोडवणूक करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला असल्याचे त्यांनी सांगितले. सततच्या पाठपुराव्या मुळेच शासनाने पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली असून त्यासाठी दोन सदस्य अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे.

या मंडळाच्या माध्यमातून पत्रकारांना छोटे मोठे उद्योग उभे करण्यासाठी अर्थसाह्य उपलब्ध करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पत्रकारांना कुठल्या प्रकारची सुरक्षा नसल्यामुळे ते असुरक्षित असून त्यांची राज्यस्तरावर पत्रकारांची १० लाख रुपयांची विमा पॉलिसी उतरविण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तर अधिस्विकृतीसाठी १० वर्ष पत्रकारिता केली असल्याचा अनुभव ग्राह्य धरून सरसकट पत्रकारांना अधिस्विकृती देण्यात यावी अशी आग्रही मागणी त्यांनी केली. तसेच शंकरराव चव्हाण कल्याण निधीच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या पेन्शनच्या अटीमध्ये सलग ३० वर्षे एका दैनिकात काम करणे ही अट रद्द करावी व २० वर्ष पत्रकारितेची सेवा ग्राह्य धरावी असे त्यांनी सांगितले. यावेळी तालुकाध्यक्ष रणजित गवळी,



कार्याध्यक्ष रामरतन कांबळे, उपाध्यक्ष रामराजे जगताप, डिजिटल विंगचे तालुका अध्यक्ष अमोल रणदिवे, कोषाध्यक्ष सतिश तवले, संघटक अतुल कुलकर्णी, तालुका प्रसिद्धीप्रमुख दीपक माळी ,साप्ताहिक विंग कार्याध्यक्ष राजाभाऊ बारगुले साप्ताहिक विंग उपाध्यक्ष नाना फाटक साप्ताहिक विंग सचिव जयणारायन दरक, सदस्य सिकंदर पठाण , प्रेस फोटोग्राफर राजेश कांबळे, तांबोळी आदींसह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# सोलापूरच्या विमानसेवेसाठी खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडून पाठपुरावा

## विमान वाहतूक मंत्री मोहोळ यांची घेतली भेट

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्यातील बहुचर्चित बोरामणी येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम सुरू करण्यासाठी आणि होटगी रोडवरील विमानतळावरून विमान सेवा सुरू करण्यासंदर्भात खासदार प्रणिती शिंदे यांनी पाठपुरावा सुरू केला आहे. या दोन्ही विमानतळाचे प्रलंबित प्रश्र्न घेऊन खासदार शिंदे यांनी बुधवारी केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेतली आहे. या भेटीत त्यांनी विमानतळाचे काम सुरु करण्यासाठी निवेदन दिले आहे.विमानतळाच्या प्रश्र्नासंदर्भात मोहोळ यांची भेट घेऊन दिलेल्या घेतलेल्या निवेदनात प्रणिती शिंदे यांनी म्हंटले आहे की, सोलापूरमध्ये बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि होटेगी रोड अशी दोन विमानतळ आहेत. सध्या होटगी रोड येथील विमानतळा वरून विमान उड्डाण सेवा सुरु करण्यासाठी आवश्यक चाचण्या यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत. त्यामुळे या विमानतळवरून तत्काळ विमान सेवा सुरु करायला हवी. अशी विनंती त्यांनी मंत्र्यांना केली आहे.



या शिवाय सोलापूर मधील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम अधिक वेगाने करायला पाहिजे. यासाठी आपल्या अध्यक्षतेखाली एका बैठकीचे नियोजन होणे आवश्यक आहे. यासंदर्भात आपणाकडून सकारात्मक कार्यवाही व्हावी अशी अपेक्षा खासदार प्रणिती शिंदे यांनी निवेदनातून व्यक्त केली आहे. खासदार शिंदे यांनी दिलेल्या निवेदनाला केंद्रीय विमान वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. येत्या काळात होडगी रोडवरील विमानतळावरून लवकरच विमानसेवा सुरू होईल. बोरामणी येथील आंतरराष्ट्रीय विमानतळा च्या प्रलंबित विकास कामाचा मार्ग देखील मोकळा होण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

# तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्‌घाटन



**दैनिक यशसिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधीः अक्कलकोट स्टेशन- श्री काशीविश्र्वेश्र्वर प्रशाला जेऊर येथेअक्कलकोट तालुकास्तरीय १४, १७ व १९ वर्ष शालेय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन मैदानी पूजनाने माजी सरपंच जेऊरचे शिवाजी कलमदाणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच काशीराया काका पाटील,अंबाराया कतोजी,सुभाष पाटील,शिवराज बोरीकरजगी,मुख्याध्यापक महेशकुमार चानकोटे,तालुका क्रीडा समन्वयक परमेश्र्वर व्हसुरे,उपप्रमुख नागराज कलबुर्गी,प्रमुख उमेश नेवाळे,दत्तात्रय हिळी,प्रकाश ननवरे,सचिन गडसिंग,प्रकाश सोनटक्के यांच्यासह तालुक्यातील क्रीडा शिक्षक खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते या स्पर्धेसाठी पंच अविनाश राठोड,गोविंद राठोड,रविकिरण इंगळे,कुमार जाधव,कल्याणी लकशेटी,सोहेल शेख,धोंडू राठोड,दयानंद उटगे,एकनाथ मोसलगी,परमेश्र्वर पाटील,फारुख शेख,बाबू पवार,विजय खोबरे,पंचप्पा सोनकवडे, रमेश सोनकर तुकाराम शिंदे,राठोड कांबळे आदी यांनी काम पाहिले.

# श्रावण महिना निमित्त वागदरी येथे दानम्मा देवी पुराण व पाळणा कार्यक्रम

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

वागदरी/प्रतिनिधीः उमराणी येथे जन्मलेल्या लिंगम्माने दानम्मा म्हणून प्रसिद्धी मिळवून, बसव कल्याण येथे जावून बसवेश्र्वर कडून दानाम्मा म्हणून घेत लोकउद्धार केली . इथे पुराणात वागदरीच्या मातांनी त्या दिवशी जन्मलेल्या लिंगम्माला पाळण्यात घालून जन्म दिनाच्या



संभ्रमात साजरा केला हे खरोखरच कौतुकास्पद आहे. असे राजशेखर स्वामी म्हणाले

तालुक्यातील वागदरी येथे बुधवारी रात्री येथील महिलांनी श्रावण महिन्यानिमित्त हनुमान मंदिर येथे परमेश्र्वर पंच कमिटी व जागतिक लिंगायत महासभा शाखा वागदरी यांच्या वतीने आयोजित गुड्डापूर दानम्मा देवी पुराण कार्यक्रमात दानम्मा जन्मानंतर पाळणा सोहळा साजरा केला. स्वामीजी पुराणामध्ये पुढे बोलताना पुराण कथांमधील असे कार्यक्रम लक्षवेधी पद्धतीने सादर करून आपल्या गावाची संस्कृती जिवंत ठेवण्याचे काम महिला करत असल्याचे स्वामीजी म्हणाले

पुराणात, राजशेखर श्रींनी दानम्मा देवीच्या जन्मदात्या पालकांबद्दल सांगितले आणि स्त्रियांना देवीच्या पाळणा कार्यक्रमासाठी आमंत्रित केले. पाळणा कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य सांगितल्यावर सर्व महिलांनी एक एक करून साहित्य दिले. त्यानुसार महिलांनी पाळणा, अंथरूण, कपडे, कुलाई, लिंग, चांदीच्या बांगड्या, घागर यासह अनेक वस्तू आणल्या आणि पाळणा फुलांनी सजवला.पुराणात आलेल्या प्रसंगानुसार जमलेल्या सर्व स्त्रिया एकत्र जमल्या, जगदेवी पोमाजी, कन्नड शाळेतील मुली, शिवशरणाय स्वामींनी जोगुळ गायला, तंगेम्मा ठोंबरे, कांताबाई पोमाजी, महादेवी कलशेट्टी, महादेवी मठपती, लिंगम्मा, लक्ष्मी, पार्वती यांच्यासह अनेक महिलांनी बाळाचे नाव ठेवले ठेवले. जमलेल्या सर्व लोकांनी टाळ्या वाजवून आनंद साजरा केला.

पंच कमिटीचे घळय्या स्वामी, जागतिक लिंगायत महासभेचे जिल्हाध्यक्ष शिवानंद गोगाव , परमेश्र्वर पोमाजी , अशोक पोमाजी, वागदरी शाखे चे सचिव शांतेश्र्वर कोटे, विजय निंबाळे, संजय मठपती, कल्लेणी हळीमनी, चंद्रकांत यमाजी, परमेश्र्वर मुनोळी, लक्ष्मीबाई पोमाजी, नागप्पा पोमाजी, पार्वती मठपती मल्लम्मा मठपती, श्र्वेता कणमुसे, इमला पोमाजी, सहित अनेक महिला वर्ग , मान्यवर उपस्थित होते.शिवशरणय्या स्वामी निंगदल्ली, प्रवीणा पांचाळ यांनी कार्यक्रमाला संगीत दिले. वागदरी येथील हनुमान मंदिरात गुड्डापूर दानम्मा देवी पुराण कार्यक्रमात महिलांच्या हस्ते दानम्मा देवी पाळणा कार्यक्रम पार पडला. तंगेम्मा ठोंबरे, महादेवी कलशेट्टी, गंगाबाई पोमाजी, कांताबाई पोमाजी आणि अनेक महिला आहेत.

# बबलाद येथे दलित वस्ती सुधार योजनेतील निधीचा गैरवापर केल्याचा विरोधकांचा आरोप

## मागासवर्गीय सरपंचाचा बदनामी केल्यास यापुढे कायदेशीर कारवाई करणार : अंबिका अचगौंड

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधी : दलित वस्ती सुधारण्यासाठी शासनाने दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत लाखो रुपयांची निधी उपलब्ध करून दिली आहे.दलित वस्तीत निधी खर्च करण्याऐवजी ज्या ठिकाणी दलितांचे एकही घरे नाही, अशा ठिकाणी दलित वस्ती सुधार योजनेची रक्कम नियमबाह्या दाखवून लाखो रुपयांचे बिल उचलण्यात आले असे आरोप विरोधकांनी केले आहे. सरपंच ग्रामसेवक एकप्रकारे दलित लोकांना चुनाच लावला.या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी पत्र देण्यात आले.परंतु प्रशासनानी याची कोणतीच दखल घेतली नाही.बबलाद येथील गट नंबर ४ मधील ७२आर शेतजमीन गटामध्ये तहसीलदार यांचे पूर्व परवानगीने या गटात ५३प्लॉटची विक्री केली आहे.या गटामध्येपाच रस्ते असून त्यापैकी दक्षिण उत्तर येथे दोन रस्ते ग्रामपंचायतीने दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत आरसीसी रस्ते केले.सदर हे रस्ते करण्यापूर्वी जगदेवी मड्डी यांना कोणतीच लेखी व तोंडी पूर्व परवानगी न देता,शिवाय गटाच्या प्लॉटमध्ये दलित लोकांची एकही कुटुंब नसतांना,या ठिकाणी नियमबाह्य रस्ते तयार करून ग्रामसेवक यांनी दलित वस्ती निधीचा दुरुपयोग केलेला आहे.

दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत खर्च होणाऱ्या निधीचा गैरवापर केला जात असून या निधीची चौकशी करण्यात यावी,अशी मागणी करणारे निवेदन जगदेवी मडडी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी सोलापुर यांना दिले.तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प सोलापूर व गट विकास अधिकारी पं.स अक्कलकोट यांना एक प्रत देण्यात आले.एकाही अधिकाऱ्याकडून या तक्रारी अर्जाची दखल घेतली नाही.विचारना केल्यास उडवा उडवी उत्तरे देत आहे.

बबलाद येथील दलित वस्ती योजनेचा योजनेच्या संदर्भात मला काहीच माहित नाही.विस्तार अधिकाऱ्यांच्या मार्फत सत्य काय चौकशी करून पुढील निर्णय घेऊ- **शंकर कवितके-गट विकास अधिकारी पं.स. अक्कलकोट**

बबलाद येथील दलित वस्ती मधील निधी दलित वस्ती ते गावांमध्ये जाणारे रस्ता साठी गेल्यावर्षी वापरण्यात आले असून काही जातीवादी लोकांना दलित वस्ती रस्ता केलेले आवडले नाही त्यामुळे सरपंच व गावाचे बदनामी करण्यासाठी खोटे अर्ज खोटे बातमी देऊन माझे बदनामी करणाऱ्या विरोध अनुसूचित जाती जमाती आयोग यांच्याकडे लेखी तक्रार करणार असून मागासवर्गीय सरपंचाच यापुढे बदनामी केल्यास त्याच्या विरोध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल **-सौ.अंबिका अचगौंड,सरपंच बबलाद**

दलित वस्ती निधीचे दुरुपयोग करणाऱ्याची चौकशी करून संबंधितावर गुन्हा दाखल करून रक्कम वसुली करण्यात यावी अशी लेखी तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी सोलापूर यांना देण्यात आली आहे.परंतु त्यांच्याकडून कुठलीच दखल घेण्यात आलेली नाही.प्रशासनाचे फक्त भोंगळ कारभार सत्ताधाऱ्याच्या माध्यमातून सुरू आहे.हे तात्काळ थांबण्यात यावा. एवढीच आमची माफक अपेक्षा आहे.**- जगदेवी मडडी - बबलाद,अक्कलकोट**

गेल्या अनेक वर्षापासून दलित वस्ती पासून गावामध्ये जाण्यासाठी रस्ता नव्हते ते रस्ता मंजूर करून घेऊन गुणवत्ता पद्धतीने केल्याने मागासवर्गीय सरपंचाचे नाव होत असल्याने त्याचे बदनामी करण्यासाठी खोटी अर्ज व खोटी बातमी देत असल्याचे गावात चर्चा चालू आहे

# भिवंडी ग्रामीणमधील वाहतुक कोंडी सोडवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्या समवेत बैठक

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

भिवंडी/मिलींद जाधव : भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील रस्त्यावर विविध कारणांनी होणारी प्रचंड वाहतुक कोंडी व नागरीकांना होणारा मनस्ताप लक्षात घेता शिवसेना उपनेते प्रकाश पाटील व आमदार शांताराम मोरे यांनी जिल्हाधिकाऱ्यासमवेत बैठक घेऊन उपाययोजना करण्याची मागणी केली.

भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील काल्हेर, कशेळी, माणकोली, राष्ट्रीय महामार्ग ०३ वरील वडपे बायपास,तळवली पोलीस चौकी, खड़वली फाटा, वासिंद, आसनगाव तसेच वाडा भिवंडी रस्ता या ठिकाणी रस्त्याची अतिशय दुरवस्था झाली असुन अपुऱ्या सोयी- सुविधांमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने, वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे यावर उपाययोजना करण्यासाठी सोमवारी (५ ऑगस्ट) रोजी जिल्हाधिकारी ठाणे यांच्या दालनामध्ये शिवसेना उपनेते प्रकाश नकुल पाटील भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे, पोलीस अधीक्षक ठाणे (महामार्ग सुरक्षा पोलीस)अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे उपविभागीय अधिकारी भिवंडी, पोलीस उपायुक्त शहर वाहतूक शाखा ठाणे, प्रादेशिक परिवहन




अधिकारी ठाणे, उप अभियंता एम. एस. आर. डी. सी. उप अभियंता एम. एम. आर. डी. ए. मेट्रो, यांच्या अधीकाऱ्या समवेत बैठक घेऊन सदर समस्येचे निराकरण करण्याची मागणी केली.त्यानुसार अशोक शिनगारे जिल्हाधिकारी ठाणे यांनी पोलीस उपायुक्त शहर वाहतूक शाखा ठाणे यांना ७ दिवसाच्या आत वाहतूक कोंडी होऊ न देण्याचे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता यांना रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्याचे व सुरु असलेली कामे जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश दिले.

# नागणसुर कन्नड शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बसलिंगय्या स्थावरमठ यांनी शाळेतील तीनशे विद्यार्थ्यांना अन्नदान करत केला वाढदिवस साजरा

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीःनागणसुर (तालुका अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुले शाळेचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष स्वतःचा वाढदिवस निमित्त होणाऱ्या खर्चाला फाटा देऊन जिल्हा परिषद कन्नड मुले - मुली शाळेतील सुमारे तीनशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना गोड जेवण देऊन वाढदिवस विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये साजरा करून आदर्श निर्माण केले आहे. सध्याच्या युगात स्वतःचा वाढदिवस मौज मजेने व्यर्थ खर्च करत फटाके फोडत साजरा करताना अनेकांना पाहिलं आहे.परंतु नागणसुर येथील जिल्हा परिषद कन्नड मुले शाळेचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष असलेलं बसलिंगय्या स्थावरमठ यांनी व्यर्थ वाया खर्च न करता त्याच पैसेच्या सदुपयोग करत कन्नड मुले व मुली शाळेतील विद्यार्थांना गोड जेवण शिरा, भात आमटी यथेच्छ जेवण दिल्याने पंच क्रोशितील पालकांनी आनंद व्यक्त करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिले आहे. प्रारंभी शाळेतील विद्यार्थ्यांनी सरस्वती आणि सावित्रीबाई



फुले प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी गावचे उपसरपंच धनराज धनशेट्टी होते.व्यासपीठावर सोमनाथ कोनापुरे, लक्ष्मण हणमगोंड, नागणसुरे, श्रीशैल हडपद,बसवराज दोडमनी,चिदानंद मठपती, विद्याधर गुरव, श्रीशैल दोडमनी,बसवराज खिलारी,विश्र्वनाथ देवरमनी,चंद्रकांत मायनाळे आदी उपस्थित होते.कार्यक्रमात कार्यानुभव प्रसंगोपात उपक्रमांतर्गत टाकावू वस्तू पासून टिकावू वस्तू , डेकोरेशन स्पर्धेत लक्ष्मी हिप्परगी,वैभवी गोपगोंडा,भक्ती हिप्परगी,पार्वती इंडी,लक्ष्मी शिवूर,प्रतीक्षा प्रचंडे,गायत्री प्रचंडे ,योगेश कोनापूरे,श्रीशांत मणुरे,खाजप्पा माशाळकर,समर्थ प्रचंडे,महांतेश इंडी,बसवा हिप्परगी आदी विद्यार्थ्यांना अनुक्रमे प्रथम ,द्वितीय,तृतीय क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक मान्यवरांचा हस्ते देऊन सत्कार करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्याधर गुरव यांनी केले तर आभार शरणप्पा फुलारी यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्याधर गुरव, श्रीशैल दोडमनी,कल्लय्या गणाचारी,बसय्या स्वामी,राजशेखर कुरले,शिवशरण म्हेत्रे, शरणप्पा फुलारी,राजशेखर खानापुरे,खाजप्पा किणगी लक्ष्मीकांत तळवार,शांता महांत फुलारी, परशुराम चव्हाण आदी परिश्रम घेतले .

# स्वेरीमध्ये प्रथम वर्ष बी.फार्मसी प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया सुरू!

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम वर्ष बी.फार्मसीच्या (पदवी) प्रवेशासाठी येथील स्वेरीच्या बी.फार्मसी महाविद्यालयात स्क्रूटिनी सेंटर (एस.सी.क्र.-६३९७) या केंद्राला मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी मान्यता दिली आहे. गुरुवार, दि. ०८ ऑगस्ट, २०२४ पासून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे पडताळणी व छाननी आदी बाबी सुरू झाल्या असून रजिस्ट्रेशनची ही प्रक्रिया बुधवार, दि. १४ ऑगस्ट, २०२४ पर्यंत चालणार आहे. त्यानंतर बी.फार्मसी कॉलेज निवडण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुरु होईल.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित बी.फार्मसी (पदवी) महाविद्यालयात प्रथम वर्ष प्रवेशासाठीची रजिस्ट्रेशन प्रक्रिया गुरुवार, दि. ०८ ऑगस्ट, २०२४ पासून सुरू झाली असून ही प्रक्रिया बुधवार, दि. १४ ऑगस्ट, २०२४ पर्यंत चालणार आहे. या कालावधीत ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे, प्रमाणपत्रे पडताळणी व छाननी आदी प्रक्रिया चालणार आहेत. रजिस्ट्रेशनची तात्पुरती यादी दि. १९ ऑगस्ट रोजी तर 'अंतिम यादी' दि. २४ ऑगस्ट, २०२४ रोजी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर जाहीर होईल तसेच तात्पुरत्या यादीनंतर विद्यार्थ्यांचे चुकलेले अर्ज दुरुस्त करून घेण्यासाठी दि. २० ऑगस्ट ते दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत हा कालावधी असणार आहे.

प्रवेशाच्या प्रक्रियेसाठी आवश्यक यंत्रणेसह स्वेरी फार्मसी सज्ज झाली आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीमध्ये बी.फार्मसीची स्थापना २००६ साली झाली असून बी.फार्मसी प्रथम वर्षाचे प्रवेश फॉर्म भरण्याकरीता पंढरपूर पंचक्रोशीतील व ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी सोलापूर, सांगली, पुणे अशा ठिकाणी जात होते. स्वेरीमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया केंद्र झाल्यामुळे विद्यार्थ्यांना आता इतरत्र जावे लागणार नाही. स्वेरी फार्मसी महाविद्यालयाचा शैक्षणिक क्षेत्रातील चौफेर विकास पाहून तंत्रशिक्षण संचालकांनी स्वेरी बी.फार्मसीला प्रवेश प्रक्रिया केंद्र (एफ.सी. क्र.-६३९७) केंद्र म्हणून मान्यता दिली आहे. या बी. फार्मसी प्रवेश प्रक्रियेचा लाभ बारावी सायन्स उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना घेता येईल.

प्रवेश प्रक्रियेच्या अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी प्रशासनाच्या http:// www.mahacet.org/ या संकेतस्थळाला भेट द्यावी. यासंबंधी अधिक माहितीसाठी बी.फार्मसी प्रवेश प्रक्रिया केंद्राचे प्रभारी प्रा. हेमंत बनसोडे (मोबा.क्र ८८३०९८७३७८) व डॉ. वृणाल मोरे (मोबा.क्र-९६६५१९६६६६) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी केले आहे.